**नि.फौ.ख.क्र.१०/२०१५**
सरकार – वि.- आरीफ शेख
**निशाणी क्र. २५**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र. १ -</u>**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – तन्वीर रशीद शेख (पंच)
वय – ३८ वर्षे, व्यवसाय – मजुरी
सध्या रा. - ताडीवाला रोड, पुणे.

**<u>फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम २९९ प्रमाणे, सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती पी.एस.काशीद यांचे मार्फत सुरु-</u>**

दि. १९/०९/२०१४ रोजी मला अमित गवारे साहेबांनी पंचनाम्याकामी लोहमार्ग पोलीस स्टेशनला बोलवले होते. तेथे एक इसम नामे आरीफ शेख हजर होता. माझे समक्ष गवारे साहेबांनी त्याची अंगझडती घेतली. त्याच्या अंगझडतीमध्ये काही मिळुन आले नाही. तसेच त्याच्या शरीरावर मारहाणीबाबत निशाण नव्हते. माझे समक्ष पंचनामा करण्यात आला त्यावेळी दुसरा पंच महेश हजर होता. आता मला अंगझडती पंचनामा दाखवण्यात आला. तो तोच असुन त्यावर माझी, दुसरा पंच महेश, गवारे साहेब यांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास **नि.क्र. २६** देण्यात येतो. मला गुन्हयाबाबत काही माहिती नाही.

२. पोलीसांनी मला दि. २०/०९/२०१४ रोजी पोलीस स्टेशन येथे बोलवले होते. आरोपी आरीफ शेख याने माझे समक्ष निवेदन दिले की, काही दिवसापुर्वी त्याने लोकल ट्रेनमध्ये एका इसमाचे पाकीट चोरले होते. त्यामध्ये रोख रक्कम १२००/- व इतर कागदपत्रे होती. गवारे साहेबांनी माझे समक्ष निवेदन पंचनामा तयार केला तो ११.०० वाजता सुरू होवुन ११.१० मिनीटांनी संपला. माझे सोबत दुसरा पंच बालाजी होता. तो पंचनामा दाखवल्यास मी ओळखु शकतो. आता मला निवेदन पंचनामा दाखवण्यात आला. तो तोच असुन त्यावर माझी, दुसरा पंच बालाजी, गवारे साहेब व आरोपीची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास **नि.क्र. २७** देण्यात येतो.

३. निवेदनात आरोपीने सांगितले की, सदरचे चोरलेले पर्स त्याने दापोडीच्या घरात

ठेवली आहे, तेथे घेवुन गेल्यास काढुन देतो असे सांगितले. निवेदनाप्रमाणे आम्ही सरकारी वाहनाने दापोडी येथे रवाना झालो. आरोपीच्या सांगण्याप्रमाणे त्याचे घरासमोर गाडी थांबवली. आरोपीने त्याच्या घरातील पाकीट आम्हीस काढुन दाखवले. त्यानंतर ते गवारे साहेबांनी जप्त करुन जप्ती पंचनामा तयार केला. पंचनामा ०१.०० वाजता संपला. आता मला सदरचा जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. तो तोच असुन त्यावर माझी, दुसरा पंच बालाजी, गवारे साहेब व आरोपीची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास **नि.क्र. २८** देण्यात येतो. आरोपीला पाहिल्यास मी ओळखु शकतो.

**सरतपास पुर्ण.**

**<u>आरोपी हा फरार असल्याने उलटतपास नाही.</u>**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2026.01.17 17:19:49 +0530

**(एन.जे.चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.
दि. १७/०१/२०२६